जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# प्रेसनोट क्रमांक - ३७६ दिनांक - २२/०५/२०२३

## पोलीसांकडून वाहन चोरां विरोधात धडाकेबाज कारवाई

## वाहन चोरटयांकडुन १० दुचाकी वाहने हस्तगत

दि.१९/०५/२०२३ रोजी वानवडी पोलीस स्टेशन हद्दीत वरिष्ठांचे आदेशाने वाहन चोरी प्रतिबंध करण्यासाठी तपास पथक प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार पेट्रोलिंग करीत असताना, रामटेकडी इंडस्ट्रियल एरिया, रेल्वे अंडर बायपासजवळ दुचाकीवरून जाणारे दोन अनोळखी इसमांना थांबविणेचा इशारा केला असता, त्यांनी त्यांची वाहने भरधाव वेगात पळुन जात असताना, त्यांचा सिनेस्टाईल पाठलाग करून **१.दिनेश रघुनाथ शिंदे, वय २८ वर्षे,रा.मातंग वस्ती,वैदयुवाडी,हडपसर,पुणे २.आकाश तुळशीराम ननवरे,वय २५ वर्षे,रा.गोसावी वस्ती, हडपसर,पुणे** यांना ताब्यात घेण्यात आले.

वर नमूद अनोळखी इसम व त्यांचे ताब्यातील वाहनाबाबत पोलीस ठाणे गुन्हे अभिलेखांची पाहणी करून सदरील अनोळखी इसम यांना अटक करून त्यांचेकडे अधिक तपास केला असता, पुणे शहरात वेगवेगळया परिसरात वाहन चोरी केले असल्याचे निष्पन्न झाले आहे. वरील आरोपी यांचेकडे तपासादरम्यान खालील पोलीस स्टेशनकडील गुन्हे उघडकीस आले असून, एकुण ०८ मोटारसायकल असा एकुण ३,६५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. पुढीलप्रमाणे एकुण ४ गुन्हे उघडकीस आले आहेत.

१) वानवडी पोलीस स्टेशन गु.र.नं. १२६/२०२३ भादवि कलम ३७९
२) कोंढवा पोलीस स्टेशन गु.र.नं. ३५५/२०२२ भादवि कलम ३७९
३) खडक पोलीस स्टेशन गु.र.नं. २७/२०२३ भादवि कलम ३७९
४) सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरीचिंचवड पोलीस आयुक्तालय गु.र.नं. ५७०/२०२२ भादवि कलम ३७९

(इतर ०४ दुचाकी वाहनांचा तपास चालू आहे.)

तसेच वानवडी पोलीस स्टेशनकडील गुन्हा रजि.नंबर २२८/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपीस गुन्हयाचे ठिकाणी असलेल्या सीसीटिव्ही फुटेजवरून आरोपीने गुन्हयात चोरलेली यामाहा दुचाकी व गुन्हा करतेवेळी वापरलेली पल्सर ताब्यात घेण्यात आले असून, सदर संबधाने आरोपीत यांचा २४ तासाच्या आत शोध घेवून, **बरकत अब्दुल शेख, वय ४५ वर्षे, रा. जैन टाऊनशिप, हांडेवाडी रोड, हडपसर, पुणे यास अटक करणेत आलेले आहे.** सदर आरोपीत यांचेकडील

वानवडी पोलीस स्टेशनकडील गुन्हा रजि.नंबर २२८/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा उघडकीस आणुन, यामहा कंपनीची एक दुचाकी तसेच पल्सर गाडी जप्त करणेत आलेली आहे.

सदर गुन्हयात ०२ दुचाकी जप्त करून एकुण रू.१,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून, २४ तासाच्या आत गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप-निरीक्षक,संतोष सोनवणे तपास पथक, वानवडी पोस्टे हे करत आहेत.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर श्री रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उपआयुक्त परि.-५, पुणे शहर श्री विक्रांत देशमुख, व मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर श्रीमती पौर्णिमा तावरे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक भाऊसाहेब पटारे, पोलीस निरिक्षक गुन्हे संदिप शिवले व तपास पथकातील पोलीस उपनिरिक्षक संतोष सोनवणे,अजय भोसले,सपोफौज रासगे, पोलीस अंमलदार अमजद पठाण, संतोष नाईक, विनोद भंडलकर,हरिदास कदम,अतुल गायकवाड, राहुल गोसावी, संदिप साळवे, निलकंठ राठोड, विष्णु सुतार,विठ्ठल चोरमले,अमोल गायकवाड,व महिला पोलीस अंमलदार मनिषा सुतार,सोनम भगत यांनी केली आहे.